प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

फेब्रुवारी 5, 2016

**भारत सरकार, इन्फ्लेशन इंडेक्स्ड बाँड्स-2023 ची पुनर् खरेदी करणार**

“भारत सरकारने, 1.44 टक्के इन्फ्लेशन इंडेक्स्ड सरकारी बाँड्स-2023” ची पुनर् खरेदी, उलट लिलावामार्फत, एकूण रु.6500 कोटींना(दर्शनी मूल्य) करावयाचे अधिसूचित केले आहे.

अतिरिक्त असलेल्या रोख शिल्लक रकमांचा उपयोग करुन, सरकारी भाग धारणाचे (स्टॉक) मुदतपूर्व विमोचन करण्यासाठी, सरकारद्वारे ही पुनर् खरेदी केली जाईल.  सरकारी स्टॉकची वरील पुनर् खरेदी केवळ *तात्पुरत्या* स्वरुपाची असेल.

प्रतिभूतींसाठीचा लिलाव हा लिलाव-नमुन्यावर आधारित किंमतीवर केला जाईल.  हे लिलाव बहुविध मूल्य रीतीचा वापर करुन केले जातील.  ह्या लिलावासाठीच्या बोली, इलेक्ट्रॉनिक स्वरुपात, भारतीय रिझर्व बँक कोअर बँकिंग सोल्युशन(ई-कुबेर) प्रणालीवर, फेब्रुवारी 11, 2016 (गुरुवार) रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 पर्यंत सादर केल्या जाव्यात.  ह्या निकालांचा परिणाम त्याच दिवशी घोषित केला जाईल.

**पुढील बाबतीत आरबीआयने हक्क राखून ठेवले आहेत.**

- वैय्यक्तिक प्रतिभूतींच्या रोखीचे आकारमान ठरविणे
- रु.6500 कोटी ह्या एकूण रकमेपेक्षा कमी रक्कम स्वीकारणे
- कोणतेही कारण न देता, कोणतीही ऑफर किंवा सर्व ऑफर्स, संपूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे किंवा फेटाळणे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1854**